# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

स्थायी समिती दिनांक ३०/०१/२०२४ अंदाजपत्रकीय विशेष सभा

---

## कार्यवृत्त

आज दिनांक ३०/०१/२०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या लेखा विभागांतर्गत तयार केलेल्या सुधारित व नवीन अंदाजपत्रकांना तसेच कृती आराखड्यांना मंजुरी प्रदान करण्याकरिता प्रशासकीय (स्थायी) अंदाजपत्रकीय विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.

त्यानुसार लेख परीक्षक न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकांना तसेच कृती आराखड्यां वरील मुख्याधिकारी यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.

मलकापूर न. प. चे सन २०२३-२४ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२४-२५ चे नवीन अंदाजपत्रक लेखापाल, लेखापरीक्षक व मुख्याधिकारी यांनी तयार करून सादर केले. यावर सविस्तर चर्चा केली. सन २०२३-२४ चे सुधारित व सन २०२४-२५ चे नवीन अंदाजपत्रक तसेच २०२२-२३ ची विभागनिहाय तुट आहे.

| **सन २०२३ - २४ चे सुधारित अंदाजपत्रक** | |
|---|---|
| सुरवातीची शिल्लक | ५००८२६०.०० |
| एकूण जमा | ५११९०७८३९.०० |
| एकूण खर्च | ५०९२२२३६२.०० |
| अखेरची शिल्लक | २६८५४७७.०० |

| **सन २०२४-२५ चे नवीन अंदाजपत्रक** | |
|---|---|
| सुरवातीची शिल्लक | २६८५४७७.०० |
| एकूण जमा | ७२७२०२००८.०० |
| एकूण खर्च | ७१७४६८००२.०० |
| अखेरची शिल्लक | ९७३४००६.०० |

| **सन २०२२-२३ ची विभाग निहाय वार्षिक तुट** | | |
|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा व जलनिस्सारण सेवा | ६०३४१६१.०० |
| २ | गटारे साफ करणे, घनकचरा वाहतूक व विल्हेवाट | ११०५०५७६.०० |
| ३ | रस्त्यावरील दिवाबत्ती | १५९६४७९.०० |
| ४ | एम.जी.पी. व नवि ६-अ चे कर्ज | २९५०१०७२.०० |
| ५ | एकात्मिक विकास योजना | ९८८०००.०० |
| | **एकूण तुट** | **४९१७०२८८.००** |

वरील तुट भरून काढण्यासाठी मुख्याधिकारी यांनी सादर केलेल्या कृती आराखड्यानुसार

१)मालमत्ता हस्तांतरण फी वाढविणे

२)शाळा भाडे वाढविणे.

३)पाणी पट्टी चे दर वाढ करणे

४) शहरातील अवैध नळ कनेक्शन शेध मोहीम राबविणे
५)न.प. चे दुकान भाड्यात वाढ करणे
६)न.प. चे मालमत्ता करावरील शास्ती (व्याज) वसूल करणे
७)न.प. चे मालमत्ता कर उपयोगिता शुल्क वसुली करणे
८)जनता कॉलेज समोर दुकासमूह उभारणे
९)न.प. प्रशासकीय इमारतीच्या खालील दुकान समूहाची हर्रासी करणे

वरील क्र १ ते ९ चे उत्पन्न साधनातून तुट भरून काढली जाईल.

वरील सर्व बाबी विचारात घेवून सन २०२३-२४ चे सुधारित व सन २०२४-२५ चे नवीन अंदाजपत्रक तसेच २०२२-२३ ची विभागनिहाय तुट भरून काढण्याचे कृती आराखड्यास हि सभा मान्यता देत आहे. तसेच न.प. विशेष सभेस मान्यते करिता शिफारस करीत आहे.

(आर.यु.सुरडकर)
प्रशासक
नगर परिषद मलकापूर